XI(6)/163/A.P.L./(06)/2026

THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI
ORDER (U/ S 163 OF BNSS -2023)

1. Whereas reports have been received that in the areas under the control of Commissioner of Police, Brihanmumbai, it is noticed that flying balloons, high riser crackers, light emitting objects, kites etc are sent up in and around the airspace, and also in the approach path of runways Laser Light Beams are flashed specifically towards landing aircraft, in the Free Flight Zone around Chatrapati Shivaji Maharaj International Airport, Juhu Aerodrome, naval air station INS Shikra thereby endangering the safe operation of aircraft in the said area;

2. And whereas it is necessary that checks should be put on the flying of paragliders, sending up of balloons, use of high riser crackers, usage of light emitting objects, flying of kites and usage of Laser Beam illumination for establishing a safe and Laser Beam Free Flight Zone around Chatrapati Shivaji Maharaj International Airport so that usage of paragliders, balloons, high riser crackers, light emitting objects, kites, Laser Beams should not affect aircraft landing, take off and safe Aircraft flying operations and that immediate action is necessary for the same;

3. Now, therefore I, **Akbar Pathan, Dy. Commissioner of Police (Operations),** Greater Mumbai and Executive Magistrate, vide powers conferred upon me u./sec 163 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 r/w u/s 10 sub section (2) of the Maharashtra Police Act 1951 do hereby order that, **in the jurisdiction of Brihanmumbai Police Commissionerate:**

A) No person shall use paragliders, send up balloons, use high riser crackers, release light emitting objects, fly kites and shoot Laser Beam in the Free Flight Zone around Chatrapati Shivaji Maharaj International Airport.

B) Any person or individual who notices such type of activities being used with the intent to obstruct landing, take off and flying operations of any aircraft shall inform the nearest Police Station.

4. This order shall come into force with effect **00.01 hrs of 01/12/2026 till 24.00 hrs of 29/01/2027 for the period of 60 days** (both days inclusive) unless withdrawn earlier.

5. Any person contravening this order shall be punishable under section 223 of the Bharatiya Nyaya Sanhita, 2023

6. As the notice cannot be served individually on all concerned, the order is hereby passed ex-parte. It shall be published for the information of public, through press, and by affixing copies on the Notice Boards of the police stations, Divisional ACsP, Zonal DCsP, Municipal Ward offices and by affixing copies at Tahsil and Ward offices.

Given under my hand and seal on this 26th day of the **November, 2026.**

Office of the
Commissioner of Police,
Brihanmumbai.

Deputy Commissioner of Police (Operations) Brihan Mumbai

(Akbar Pathan)
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate
Greater Mumbai

Scanned with CamScanner

पोआ/११(६)/१६३/ए.पी.एल./(०६)/२०२६

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

आदेश

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत

१. ज्याअर्थी, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अखत्यारीतील भागात फुगे, उंच उडणारे फटाके, प्रकाश उत्सर्जित करणारी वस्तू, पतंग इत्यादी हवाई क्षेत्रात व आसपास उडवले जात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, जुहू एरोड्रोम, नौदल हवाई स्टेशन INS शिक्राच्या आसपासच्या मुक्त उड्डाण क्षेत्रात, लॅडिंग विमानाच्या दिशेने व धावपट्टयांचा दृष्टीकोन मार्ग, लेझर लाईट बीम्स चमकवण्यात येतात ज्यामुळे उक्त क्षेत्रामध्ये विमानांचे सुरक्षित आवागमन धोक्यात येते

२. त्याअर्थी, जेथे सुरक्षित आणि लेझर बीम मुक्त उड्डाण क्षेत्र स्थापन करण्यासाठी पॅराग्लायडर्सचे उड्डाण, फुगे पाठवणे, हाय राइजर फटाके, प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या वस्तूंचा वापर, पतंग उडवणे आणि लेझर बीम प्रदीपन वापरणे यावर प्रतिबंध करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आजूबाजूला पॅराग्लायडर्स, फुगे, उंच उडणारे फटाके, प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या वस्तू,पतंग यांच्या वापरास प्रतिबंध करता येईल जेणेकरून लेझर बीमचा विमानाच्या लॅडिंग, टेक ऑफ आणि सुरक्षित विमान उड्डाण आवागमनावर परिणाम होऊ नये आणि त्यासाठी त्वरीत कारवाई करणे आवश्यक आहे;

३. आता, म्हणून मी, **अकबर पठाण, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई** तथा कार्यकारी दंडाधिकारी, बृहन्मुंबई, कलम १६३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ सह कलम १०(२), महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ याव्दारे आदेश देतो की, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेत:

अ) कोणत्याही व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आजूबाजूच्या फ्री फ्लाइट झोनमध्ये उंच उडणारे फटाके उडवणे, प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या वस्तू सोडणे, पतंग उडवणे आणि लेझर बीम प्रकाशित करणे, फुगे, पॅराग्लायडर्स उडवू नयेत.

ब) कोणत्याही विमानाच्या लॅडिंग, टेक ऑफ आणि आवागमनामध्ये अडथळा आणण्याच्या उद्देशाने अशा प्रकारच्या क्रियाकलापांचा वापर केल्याचे लक्षात येताच कोणतीही व्यक्ती जवळच्या पोलीस ठाणेस माहिती देईल.

४. हा आदेश **दि. ०१/१२/२०२६ रोजीचे ००.०१ पासून दि. २९/०१/२०२७** रोजीचे २४.०० वाजेपर्यंत पूर्वी मागे घेतल्याशिवाय (दोन्ही दिवसांसह) ६० दिवसांच्या कालावधीसाठी प्रभावी असेल.

५. या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत दंडनीय असेल.

६. सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे आदेश एकतर्फी पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितीसाठी सर्व पोलीस ठाणे, सर्व स.पो.आ., सर्व पो.उ.आ., महानगरपालिका प्रभाग कार्यालयांच्या सूचना फलकांवर आणि तहसील आणि प्रभाग कार्यालयात प्रती चिकटवून व प्रसार माध्यमांद्वारे ते प्रसिध्द केले जातील.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक २६ **नोव्हेंबर, २०२६** रोजी दिला आहे.

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई यांचे कार्यालय

Deputy Commissioner of Police (Operations) Brihan Mumbai

(अकबर पठाण)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
तथा कार्यकारी दंडाधिकारी
बृहन्मुंबई

Scanned with CamScanner